# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## मान्सून दोन-तीन दिवसांत केरळममध्ये दाखल होणार

नवी दिल्ली दि.१ (वृतसंस्था)- भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे की, नैऋत्य मान्सून पुढील २ ते ३ दिवसांत केरळममध्ये दाखल होऊ शकतो. साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळममध्ये दाखल होतो, परंतु यावेळी त्याचा वेग थोडा मंद राहिला आहे. हवामान विभागाच्या मते, अरबी समुद्र, लक्षद्वीप, केरळम आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये मान्सूनच्या प्रगतीसाठी हवामान अनुकूल बनले आहे. यासोबतच बंगालच्या उपसागरातील अनेक भागांमध्येही मान्सून पुढे सरकू शकतो. आयएमडीने यापूर्वी मान्सून २६ मे रोजी केरळममध्ये दाखल होईल असा अंदाज वर्तवला होता, परंतु नंतर त्यात विलंब झाला आणि विभागाने सांगितले की, त्याची सुरुवात जूनच्या पहिल्या आठवड्यात होऊ शकते. हवामान विभागाच्या माहितीनुसार, देशभरात सध्या उष्णतेच्या लाटेची स्थिती संपली आहे. राजस्थानमधील अजमेर, नागौर आणि चित्तौडगडमध्ये सोमवारी गारपीट झाली. मध्य प्रदेशातील ४ जिल्ह्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर सुरू आहे. उत्तर प्रदेशातील झाशी आणि ललितपूरमध्ये जोरदार पाऊस झाला. राज्यातील ६३ जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहारमधील सासाराममध्ये दुपारनंतर जोरदार पाऊस झाला. तर झारखंड, छत्तीसगड, हरियाणा आणि पंजाबसह २७ राज्यांमध्ये हलक्या ते जोरदार पावसाचा इशारा आहे. उत्तराखंडमधील नैनितालसह ६ जिल्ह्यांमध्ये पाऊस झाला. खराब हवामानामुळे पिथौरागढमध्ये १२वी पर्यंतच्या सर्व शाळा बंद राहिल्या. केदारनाथ यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली. तर चंपावतमध्ये दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत अडकलेल्या ५० हून अधिक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.


(वर्ष ६५ वे अंक १४३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०२ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## विधान परिषदेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीत सामना रंगणार

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या अडीच वर्षांपासून या निवडणुका लागल्या नव्हत्या. त्यामुळे गेल्या अडीच वर्षांपासून या आमदारकीच्या जागा रिक्त आहे. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जातात. यंदा सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, नाशिक आणि अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. अनेक मतदारसंघांत अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरल्याने आणि स्थानिक नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्याने दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढली आहे.

दरम्यान, आज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. दुपारी ३ पर्यंत अर्ज भरता येणार होते. या निवडणुकीसाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामुळे प्रचंड दावे-प्रतिदावे झाले. महायुती आणि महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेदही चव्हाट्यावर आले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षांतर्गतच बंडाळी झाल्याचं दिसलं. पुण्यातून सुनील टिंगरे आणि विक्रम काकडे या दोघांनीही राष्ट्रवादीच्या तिकिटावर अर्ज भरला आहे. तर, छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीत वाद झाला. या जागेवरून भाजपाने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली आहे, तर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या समीर सत्तार यांनीही अपक्ष अर्ज भरला आहे.

प्रचंड रस्सीखेच आणि दावे-प्रतिदावे झाल्यानंतर महायुतीतून १७ जगांसाठी उमेदवारांची नाव निश्चित झाली आहेत. भाजपा ११, शिवसेना (एकनाथ शिंदे) ४, राष्ट्रवादी (अजित पवार) २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस ८ जागांवर, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष ५ जागांवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तीन जागांवर निवडणूक लढवणार आहे.

### तर त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घेतले जातील-उपमुख्यमंत्री शिंदे

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात महायुतीतील काही जागांवर उमेदवारी अर्जांवरुन धुसफूस सुरु झाली आहे. याविषयी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ४ जून पर्यंत आहे. महायुतीचे सर्व पदाधिकारी एकत्र बसून याबाबत योग्य निर्णय घेतील. ज्यांनी उमेदवारी अर्ज भरले असतील, ते माघार घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ठाणे पालघर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे महायुतीचे शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र फाटक यांनी सोमवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. रविंद्र फाटक यांनी अर्ज दाखल केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. रविंद्र फाटक यांचा विजय निश्चित असून ते प्रचंड मताधिक्याने निवडून येतील. संबंधित मतदारसंघांमध्ये महायुतीचे प्राबल्य असून बहुमतही महायुतीकडे आहे. त्यामुळे ही निवडणूक महायुती मोठ्या मताधिक्याने जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**भाजपाचे उमेदवार** -वर्धा चंद्रपूर गडचिरोली- अरुण लखाणी, भंडारा-गोंदिया- अविनाश ब्राह्मणकर, अमरावती- प्रवीण पोटे, सोलापूर- राजेंद्र राऊत, सांगली सातारा- धैर्यशील कदम, अहिल्यानगर- प्राजक्त तनपुरे, छत्रपती संभाजीनगर-जालना- सुहास शिरसाट, नांदेड अमर राजूरकर, धाराशिव बीड लातूर- बसवराज पाटील, जळगाव- नंदकिशोर महाजन, नागपूर- राजीव पोतदार,

**शिवसेना (एकनाथ शिंदे) उमेदवार**
ठाणे- रवींद्र फाटक, नाशिक- नरेंद्र दराडे, परभणी-हिंगोली- सईद खान, यवतमाळ- दुष्यंत चतुर्वेदी,

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) उमेदवार** - रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग- अनिकेत तटकरे,

**काँग्रेसचे उमेदवार** - चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली शैलेश देशमुख, अमरावती हर्षदीप देशमुख, यवतमाळ साहेबराव कांबळे, लातूर महेश देशमुख, सोलापूर आदित्य फत्तेपूरकर, नागपूर अतुल लोंढे, भंडारा-गोंदिया दिलीप बनसोड, प्रफुल अग्रवाल आणि नरेश ईश्वरकर,

**शिवसेना (उद्धव ठाकरे) उमेदवार** - नाशिक अनिल कदम, परभणी- हिंगोली डॉ. विवेक नावंदर, छत्रपती संभाजीनगर जालना देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर, जळगाव शरद तायडे, रायगड-रत्नागिरी- सिंधुदुर्ग सुरेंद्रनाथ उर्फ बाळ माने,

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)**- सांगली-सातारा अनिश्चित, पुणे- श्रीकांत पाटील, ठाणे- अभिजीत पवार,

**अपक्ष** - छत्रपती संभाजीनगर-जालना- समीर सत्तार

## भाजप शिवसेनेचे मुंडके उडवण्याचे काम करत आहे-अब्दुल सत्तार

### दोन्ही शिवसेना एकत्र आल्या पाहिजे अशी भावना केली व्यक्त



छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- राज्यातील विधानपरिषद निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या अंतिम टप्प्यात छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ महायुतीच्या जागावाटपात ही जागा भाजपला सुटली असून भाजपने सुहास शिरसाट यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, या निर्णयाला धुडकावून लावत शिवसेनेचे नेते अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. यानंतर आता स्वतः अब्दुल सत्तार यांनी भाजपवर अत्यंत गंभीर आणि खळबळजनक आरोप करत महायुतीमधील अंतर्गत युद्ध चव्हाट्यावर आणले आहे.

एका वृत्तवाहीनीशी बोलताना अब्दुल सत्तार यांचा भाजपवरील राग अनावर झाला. अत्यंत आक्रमक भाषेत भाजपवर प्रहार करताना ते म्हणाले, ''शिवसेनेचे मुंडके उडवण्याचे काम आपला मित्रपक्षच करत आहे. आमचा त्याग गुवाहाटीतील कामाख्या देवीला माहिती आहे, पण भाजप तो त्याग आता पूर्णपणे विसरली आहे. भाजप आमच्या पक्षात गटतट पाडत आहे. त्यांनी आमचे हातपाय आधीच तोडले होते, आता थेट मुंडकंच तोडून टाकलं आहे.''

पुढे बोलताना त्यांनी नाराजी व्यक्त केली की, ''आमची जिल्हा परिषद गेली, महापालिकेत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या काळापासून असणारी सत्ताही संपली, आता आमच्याकडे राहिलं काय? अनेक छोट्या जागांवर वैयक्तिक भाजपचे नेते मोठे होत आहेत आणि शिवसेनेला संपवले जात आहे.''

उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र आल्या पाहिजेत, असे विधान केले आहे. याबाबत विचारले असता अब्दुल सत्तार म्हणाले की ''मलाही वाटतं की आता दोन्ही शिवसेना एकत्र झाल्या पाहिजेत. आमच्या नेत्यांनी, म्हणजे एकनाथ शिंदे यांनी जर एकत्र येण्याचा निर्णय घेतला, तर कोणालाही विचारण्याची गरज उरणार नाही. माझा नेता जो निर्णय घेईल, तो मला पूर्णपणे मान्य असेल,'' असे त्यांनी यावेळी म्हटले.

जिल्ह्यात शिवसेनेत दोन भाग करून एका भागाला हाताशी धरायचे आणि दुसऱ्यावर अन्याय करायचा, अशी खेळी खेळून जर आमचा मोठा भाऊ आम्हालाच संपवणार असेल, तर आमच्याकडे दुसरा इलाज नाही, असा संताप देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात तब्बल ४२ ते ५३ रुपयांपर्यंत वाढ

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- देशभारत महागाईचा भडका उडाला असतानाच पेट्रोल-डिझेल सीएनजीनंतर आता पुन्हा एकदा केंद्र सरकारने सर्वसामान्यांची चिंता वाढवणारा निर्णय घेतला आहे. पुन्हा एकदा व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात लक्षणीय वाढ केली आहे. देशभरात एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाली आहे. १९ किलोंच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरांत ही वाढ करण्यात आली असून परिणामी आता ४२ ते ५३ रुपयांनी व्यावसायिक गॅस सिलेंडर महाग होणार आहे. राजधानी दिल्लीत ३ हजार ११३, तर कोलकात्यात ३ हजार २५५ रु. असा नवा दर असणार आहे. तर ५ किलो वजनाचा सिलेंडरही ११ रुपयांनी महाग होणार असल्याची माहीती आहे. ५ किलोचा सिलेंडर आता ८२१ रुपयांना मिळणार आहे. दरम्यान, आजपासूनच म्हणजे १ जुनपासून ही नवीन गॅस दरवाढ लागू होणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा महागाईचा चटका सर्वसामान्यांना आता सहन करावा लागणार आहे.

दरम्यान, आजपासून (१ जून) लागू झालेल्या या नवीन दरांचा थेट परिणाम हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि व्यवसायांवर होणार (पान ४ वर)

## सीबीएसई ओएसएम प्रणालीवर राहुल गांधींचा हल्लाबोल

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसस्था)- लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. त्यांनी दावा केला की, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका स्वयंचलित रोबोटिक स्कॅनरऐवजी मोबाईल फोनने स्कॅन करण्यात आल्या. विद्यार्थी सार्थक सिद्धांतची एक पोस्ट शेअर करत राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टीमची निविदा ऑगस्टमध्ये पुन्हा जारी करण्यात आली होती. त्यावेळी अनेक अटी काढून टाकण्यात आल्या आणि स्कॅनिंगची गुणवत्ता ३०० डीपीआयवरून २०० डीपीआयपर्यंत कमी करण्यात आली. राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, अस्पष्ट उत्तरपत्रिका, गहाळ झालेली पाने आणि अनेक प्रती स्कॅन न होणे या केवळ तांत्रिक चुका नाहीत. त्यांच्या मते, एका विशिष्ट विक्रेत्याला फायदा व्हावा यासाठी केलेल्या कराराचा हा परिणाम आहे.

ते पुढे म्हणाले की, ही एक फसवणूक आहे. आणि ज्या प्रत्येक विद्यार्थ्याचे गुण चुकीच्या पद्धतीने मोजले गेले आहेत, तो या फसवणुकीचा बळी आहे. धर्मेंद्र प्रधान आपल्या पदावर कायम आहेत. मोदींचे मौन आता केवळ उदासीनता राहिलेली नाही; ते या गुन्ह्यातील त्यांच्या सहभागाचे द्योतक आहे. जेव्हा शिक्षणाला सेवेऐवजी धंद्यात बदलले जाते, तेव्हा चुका सुधारल्या जात नाहीत. त्या अधिकच वाढतात आणि याची अंतिम किंमत आपली मुले मोजत आहेत: आपला वेळ, आत्मविश्वास आणि भविष्य गमावून बसत आहेत.

विद्यार्थी सिद्धांत कुमारने कथितरित्या स्कॅन केलेल्या प्रतींचे फोटो शेअर केले. त्याने लिहिले, ''सीबीएसई, तुम्ही म्हणालात की या प्रती स्कॅन करण्यासाठी तुम्ही स्कॅनर वापरले. आता या प्रती सार्वजनिक पाहण्यासाठी उपलब्ध झाल्या आहेत, तर कृपया स्पष्ट कराल का की स्कॅन केल्यावर कोणत्या प्रतींना ड्रॉप शॅडो आली आहे? आणि या तीन घड्या कशा पडल्या?''

राहुल गांधी यांनी उत्तरपत्रिका तपासणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत केंद्र सरकार आणि सीबीएसई बोर्डावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी एक्स पोस्टवर लिहिले की, ''खिसेकापूंपासून सावध रहा - आज तो सीबीएसईच्या आत बसला आहे.'' सीबीएसईच्या चुकीमुळे तुमचे गुण चुकले तर तुम्हाला काय मिळते? एका मुलाला एका बिलासाठी, एका बरोबर उत्तरपत्रिकेसाठी २,००० पर्यंत पैसे द्यावे लागू शकतात. कल्पना करा, जेव्हा ४००,००० विद्यार्थ्यांनी असे अर्ज सादर केले आहेत, तेव्हा सीबीएसई किती कमाई करत असेल. जेव्हा फोनवरून स्कॅनिंग केले जाते, तेव्हा चुकीचे मार्किंग अटळ असते. आणि ते दुरुस्त करून घेण्याचा खर्च ते मुले भरत आहेत. सीबीएसईची चूक. मुलांना शिक्षा आणि सरकारची कमाई असे ते म्हणाले.

## शेअर मार्केट क्रॅश, सेन्सेक्स ५०० अंकांनी कोसळला

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा सुरु झाल्यानं भारतीय शेअर बाजारावर त्याचा परिणाम झाल्याचं पाहायला मिळालं आहे. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सेन्सेक्स आणि निफ्टीत दीड टक्क्यांची वाढ झाल्याचं पाहायला मिळालं होतं. मात्र, नंतर त्यामध्ये घसरण झाली. अमेरिकेनं इराणमधील काही ठिकाणांवर केलेले हल्ले, इस्त्रायलकडून लेबनॉनमध्ये सुरु असलेले हल्ले यामुळं शेअर बाजारातील तेजी ओसरुन घसरणीचा ट्रेंड सुरु झाला. सेन्सेक्स ५०० हून अधिक अंकांनी कोसळला तर निफ्टी निर्देशांक २३७०० वरुन घसरुन २३४०० च्या खाली आला.

भारतीय शेअर बाजारात आज सेन्सेक्स ५०८ अंकांनी घसरुन ७४२६७.३४ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १६५.१५ अकांनी घसरुन २३३८३.६० अंकांवर बंद झाला. सेन्सेक्सनं दिवसभरात इंट्राडे दरम्यानं ७५३६७ अंकांपर्यंत झेप घेतली होती. मात्र, नंतर त्यात घसरण झाली. तर, निफ्टी ५० देखील २३७३३ अंकांवर पोहोचला होता. भारतीय शेअर बाजारातील घसरणीमुळं गुंतवणकदारांचं ३.७५ लाख (पान ४ वर)

## 'नीट' परीक्षा संगणकावर घेण्याची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

### फेरपरीक्षा केवळ लेखी स्वरूपातच घेतली जाईल, परीक्षा यंत्रणा आधीच दबावात

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी पुन्हा आयोजित केली जाणार आहे. पेन-पेपर परीक्षेऐवजी संगणक-आधारित परीक्षा घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. आरजेडीचे खासदार सुधाकर सिंह यांनी ही याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने यावर्षी अशी परीक्षा घेणे अव्यवहार्य असल्याचे म्हटले होते. तथापि, याचिकाकर्त्यांच्या वारंवार केलेल्या विनंतीनंतर, न्यायालयाने सांगितले की त्यांनी नीट-संबंधित याचिकांवर जुलैमध्ये सुनावणी निश्चित केली आहे. या याचिकेवरही त्यांच्यासोबतच सुनावणी होईल.

याचिकाकर्ते सुधाकर सिंह हे नीट परीक्षेसंदर्भात विविध मागण्यांसाठी न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर हजर झाले, परंतु आज त्यांनी प्रामुख्याने परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्याच्या मागणीवर जोर दिला. त्यांच्या वकिलाने न्यायालयात सांगितले, ''आज मी फक्त एकच विनंती करत आहे: की परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्यात यावी.'' न्यायमूर्ती नरसिंह यांनी टिप्पणी केली की यापूर्वीही अशाच प्रकारच्या विनंत्या करण्यात आल्या होत्या आणि त्या फेटाळण्यात आल्या होत्या. खंडपीठाने परीक्षेसंदर्भात परीक्षा अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणल्या. न्यायमूर्ती नरसिंह म्हणाले की, या टप्प्यावर असा दिलासा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यांनी नमूद केले की, अधिकारी (पान ४ वर)

## सर्वच्या सर्व ८० लाख महिला लाडकी बहीण योजनेतून बाद होणार नाहीत-मंत्री आदिती तटकरे

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ई-केवायसी प्रक्रियेनंतर ८० लाख महिलांचे अर्ज बाद झाल्याची चर्चा दिशाभूल करणारी असून या लाभार्थींची विविध निकषांनुसार पडताळणी सुरू आहे, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी स्पष्ट केले. ई-केवायसी न केलेल्या महिला, उत्पन्न मर्यादा ओलांडणारे लाभार्थी, वयोमर्यादा पूर्ण झालेल्या महिला तसेच अन्य योजनांचा लाभ घेणाऱ्यांचा या आकड्यात समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील तब्बल ८० लाख महिलांना ई-केवायसी प्रक्रियेनंतर अपात्र करण्यात आल्याचे वृत्त सोमवारी प्रसिद्ध होताच या योजनेवरून विरोधकांनी महायुतीवर टीकेची झोड उठवली. यासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी वस्तूस्थिती सांगितली. तटकरे म्हणाल्या, की ई-केवायसी प्रक्रिया गेल्या वर्षी ऑगस्टपासून सुरू करण्यात आली होती. मात्र, ई-केवायसी हा निकष केवळ लाडकी बहीण योजनेसाठी नसून राज्यातील सर्व थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजनांसाठी लागू आहे. त्यामुळे ८० लाखांचा आकडा केवळ ई-केवायसी न केलेल्या महिलांचा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांचे अनुदान वितरण सुरू असून सर्व पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अपात्र लाभार्थ्यांची नेमकी संख्या स्पष्ट होईल, असे तटकरे यांनी सांगितले.

## कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपके अमेरिकेतून भारतात येणार

### शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरवर ६ जूनला आंदोलन

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दीपके ६ जून रोजी भारतात परतणार आहेत. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर आंदोलन करणार आहे. अभिजितनेएक्स अकाउंटवर कॉकरोच इज बॅक ही माहिती दिली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील कॉकरोच (झुरळ) वक्तव्यानंतर कॉकरोच जनता पार्टी हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म उदयास आले. सीजेपीचे इन्स्टाग्रामवर २० दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत.

३० वर्षीय अभिजीत दीपके हे महाराष्ट्रातील छत्रपती संभाजी नगरमधील असून डिजिटल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहे. वृत्तानुसार, अभिजीतने पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले असून सध्या तो अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये पब्लिक रिलेशन्समध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. अभिजीतने २०२० ते २०२२ या काळात केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीसाठी सोशल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणून काम केले. २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान, अभिजीतने आपसाठी व्हायरल मीम-आधारित ऑनलाइन प्रचार साहित्य तयार केले होते. एका मुलाखतीत अभिजीतने खुलासा केला की, त्याने वैयक्तिक आयुष्य आणि आर्थिक स्थैर्यासाठी आप सोडले आणि बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये अर्ज केला. प्रवेश मिळाल्यानंतर तो अमेरिकेत स्थायिक झाला. अभिजीत आपल्या एक्स अकाउंटवरून शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून ते महागाईपर्यंतच्या राजकीय मुद्द्यांवरून केंद्र सरकार आणि पंतप्रधानांना लक्ष्य करत आहे.

## स्वेच्छेने वेश्याव्यवसाय करणे बेकायदेशीर नाही; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांच्या हक्कांच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. ''स्वेच्छेने वेश्याव्यवसाय करणे बेकायदेशीर नाही. त्यामुळे स्वतःच्या मर्जीने हा व्यवसाय करणाऱ्या प्रौढ व्यक्तींना पोलीस त्रास देऊ शकत नाहीत किंवा त्यांना विनाकारण ताब्यात घेऊ शकत नाही'', असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

इम्मोरल ट्रॅफिक (प्रिव्हेंशन) ॲक्ट म्हणजेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याचा आढावा घेताना न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. याबाबतचे वृत्त 'लाईव्ह लॉ' या न्यूज वेबसाईटने प्रसिद्ध केले आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्यानुसार वेश्यागृह चालवणे बेकायदेशीर आहे. मात्र, पोलिसांनी टाकलेल्या छाप्यादरम्यान जर एखादी प्रौढ महिला स्वतःच्या मर्जीने देहविक्री करताना आढळली, तर तिला पीडित ठरवून ताब्यात घेता येणार नाही. अशा महिलांचा 'बचाव' करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. (पान ४ वर)

## बंगालमध्ये सुवेंदू अधिकारी सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार, ३५ आमदारांनी घेतली शपथ

कोलकाता दि.१ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे सरकार आल्यानंतर तीन आठवड्यांनी सुवेंदू अधिकारी यांच्या मंत्रिमंडाळाचा विस्तार करण्यात आला आहे. ३५ आमदारांनी आज शपथ घेतली आहे. सोमवारी एका खास सोहळ्यात ३५ आमदारांचा शपथविधी पार पडला. यामध्ये १३ कॅबिनेट मंत्री, १९ राज्य मंत्री आणि ३ स्वतंत्र प्रभार मंत्री आहेत. कॅबिनेटचा विस्तार केल्यानंतर पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळात ४१ मंत्री झाले आहेत.



अर्जुन सिंह, तापस रॉय, शरदवत मुखर्जी, जगन्नाथ चट्टोपाध्याय, शंकर घोषण या मंत्र्यांनी शपथ घेतली. पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला त्यात दीपक बर्मन, तपस रॉय, डॉ. शंकर घोष, मनोज कुमार उरांव, अर्जुन सिंह, स्वपन दासगुप्ता, जगन्नाथ चॅटर्जी, कल्याण चक्रवर्ती, अजय पोद्दार, शाश्वत मुखर्जी, दूधकुमार मंडल, अनुप कुमार दास यांनीही मंत्री तर राज्य मंत्री स्वतंत्र (पान ४ वर)

## पार्थ पवार राजकारणात सक्रिय झाले चांगली गोष्ट-सुनील तटकरे

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे यांना ािाधाानापारिषादेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली असून आज त्यांचा अर्ज भरण्यात आला आहे. त्यानंतर सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा अजितदादा असताना झाल्याचेही म्हटले आहे. तसेच अजितदादांच्या विमान अपघातावरही भाष्य केले आहे.

सुनील तटकरे म्हणाले, अजितदादांच्या निधनानंतर पार्थ पवार सक्रिय होणे पक्षासाठी महत्त्वाचे होते म्हणून त्यांनी निर्णय घेतला आणि योग्य आहे. शेवटी संघटनेत काम करत असताना वेगवेगळी मते असू शकतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना १९९९ साली झाली. पवार साहेबांसारखे ६ दशक देशाच्या राजकारणात एक प्रभाव असणारे नेतृत्व मिळाले. तसेच पक्षात लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जायचे. त्यामुळे साहेबांची सुद्धा निर्णय घेण्याची प्रक्रिया सुद्धा तशीच होती. अजितदादांनी देखील तीच पद्धत (पान ४ वर)

# इंधनटंचाई व पीक कर्जामुळे शेतकरी चिंतेत

मराठवाड्यातील शेतकरी सध्या निसर्गाचा बेभरवसा, डिझेल-पेट्रोलची तीव्र टंचाई, वाढलेले इंधन दर आणि रखडलेली कर्जमाफी अशा अनेकविध संकटांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. खरीप हंगाम तोंडावर आलेला असतानाच मशागतीसाठी लागणारे डिझेल मिळेनासे झाले आहे, तर दुसरीकडे नवीन पीक कर्ज न मिळाल्याने खते आणि बी-बियाणे खरेदी कशी करावी, या चिंतेने बळीराजा ग्रासला आहे. प्रशासकीय उदासीनता आणि आचारसंहितेची आडकाठी यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, मराठवाड्यात विशेषतः बीड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्यांचा आकडा चिंताजनकरीत्या वाढत आहे.

इंधनाचे वाढलेले दर तसेच डिझेल टंचाईमुळे शेतकरी त्रस्त झाला आहे. यांत्रिकी शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना इंधन टंचाईचा फटका बसत आहे. दुसरीकडे राज्य शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी मे महिना संपत आलेला आहे. अद्याप शेतकऱ्यांची कर्जमाफी झालेली नाही. त्यामुळे नवीन पीक कर्ज मिळत नाही. खरीप हंगाम तोंडावर असल्याने खते, बी-बियाणे खरेदी कशी करावी या

'चिंतेत शेतकरी आहेत. मराठवाड्यात कोरडवाहू शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. शेतकरी कुठल्या ना कुठल्या अडचणीत सापडत असल्याने तो निसर्गचक्राला कंटाळला आहे. यामुळे शेतकरी जगण्यापेक्षा मृत्यूला कवटाळत आहे. मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. शासन सर्वतोपरी प्रयत्न करूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. जूनअखेर शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्याचे मुख्यमंत्र्याकडून स्पष्ट करण्यात आले. शासनाच्या किचकट अटी व अनेक नियमांमुळे ५०% शेतकरी कर्जमाफीच्या लाभांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या दुःखाला सत्ताधाऱ्यांनी समजून घेतले पाहिजे, अशी अपेक्षा मराठवाड्यातील शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

मराठवाड्यात जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांच्या कालावधीत तब्बल २९३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती हाती आली आहे. शेतकऱ्यांना विविध अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. वाढलेले कर्ज, शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. काही दिवसांपासून मराठवाड्यात इंधन टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या अक्षरशः पेट्रोल पंपावर रांगा व हाणामारीचे प्रकार घडत आहेत. हिंगोली व परभणी जिल्ह्यात तर अक्षरशः रात्रभर शेतकऱ्यांना डिझेलसाठी कॅन घेऊन उभे राहावे लागत आहे. डिझेल मिळत नसल्याने यांत्रिकी शेतीचा काहीही फायदा नाही हे लक्षात घेऊन शेतकरी पुन्हा बैल जोडी खरेदी करण्यावर भर देत आहेत. मराठवाड्यात यावर्षी जानेवारी महिन्यापासून एप्रिल अखेरपर्यंत सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात झाल्या आहेत. बीड जिल्ह्यात चार महिन्यांत तब्बल ७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. निसर्गाचा बेभरवसा व कर्ज हे दोन आत्महत्येमागील प्रमुख कारणे आहेत. सन २०१२ ते २०१६ या काळात मराठवाड्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ झाल्याचे शासकीय दप्तरी असलेल्या नोंदीवरून स्पष्ट होत आहे.

मराठवाड्यातील प्रमुख जिल्हा असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून ४ महिन्यांत या जिल्ह्यात ७१ शेतकऱ्यांनी फास लावून घेतला आहे. धाराशीव जिल्ह्यात ३९, नांदेड जिल्ह्यात ३३, परभणी जिल्ह्यात २४, हिंगोली जिल्ह्यात १८, जालना जिल्ह्यात २२, लातूर जिल्ह्यात १३ शेतकऱ्यांनी अलीकडच्या चार महिन्यांत आत्महत्या केल्या आहेत. मराठवाड्यातील बीड जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्याठिकाणी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा क्रमांक लागतो. बीड जिल्ह्यात चार महिन्यांत तब्बल ७३ शेतकऱ्यांच्या

आत्महत्या असून यापैकी २० शेतकरी शासकीय मदतीस पात्र ठरले आहेत, तर ४५ शेतकऱ्यांची प्रकरणे चौकशीस पात्र आहेत. आठ शेतकऱ्यांची प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत, तर १९ शेतकऱ्यांना आतापर्यंत शासकीय मदत देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांत एकूण ७१ जणांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी २० जणांना शासकीय मदत देण्यात आली, तर उर्वरित ४० प्रकरणे प्रशासकीय स्तरावर चौकशीकरिता प्रलंबित आहेत. यापैकी दोन प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण मागील पाच वर्षांमध्ये चिंताजनकरीत्या वाढले आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांपैकी तब्बल ३५ टक्के कुटुंबे शासकीय आर्थिक मदतीपासून वंचित राहत असल्याची धक्कादायक परिस्थिती समोर आली आहे. प्रशासन, पोलीस आणि महसूल यंत्रणेच्या उदासीनतेचा फटका थेट शेतकरी कुटुंबांना बसत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. शासनाकडून विविध योजना, कर्जमाफी, अनुदान आणि मदतीच्या घोषणा होत असतानाही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसल्याने कृषी धोरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विविध कारणांनी अपात्र केलेल्या आत्महत्या कुटुंबांची चिंता वाढव त आहेत. शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक प्रकरणांमध्ये पोलीस पंचनामा, महसूल चौकशी, कर्जाचा पुरावा किंवा इतर तांत्रिक कारणे पुढे करून कुटुंबांना अपात्र ठरवले जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, आधीच कर्ता पुरुष गमावलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट अधिक गडद होत आहे. काही प्रकरणांमध्ये विनाकारण मद्यपी असल्याचा शिक्का देखील मारला जात असल्याची दुर्दैवी परिस्थिती आहे

सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्याने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. राज्यशासन कर्जमाफी करणार असून या विधान परिषदेच्या निवडणुकांमुळे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला उशीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वेगवेगळ्या चक्रव्यूहात अडकलेल्या शेतकऱ्यांना आता कर्जमाफी तोंडावर असताना इंधनाचे वाढलेले दर व डिझेल टंचाईचा फटका बसत आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेची आडकाठी आली, तर शेतकरी नवीन पीक कर्ज घेण्यापासून वंचित राहू शकतो. शेतकरी वर्ग सध्या मशागतीच्या कामात लागलेला आहे; परंतु शेतकरी पूर्णपणे यंत्रावर अवलंबून असल्याने डिझेलचा फटका अनेक शेतकऱ्यांना बसत आहे. इंधनाची कमतरता शेतकऱ्यांना भेडसावत आहे. यामुळे खरीप हंगामावर चांगलाच परिणाम जाणवणार आहे. शेतमाल बाजारात पोहोचविणे महाग होऊन बसले आहे.

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

**दरवर्षी** २ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो.

लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.

या दिवसाचा इतिहास १९७५ सालातील एका महत्त्वपूर्ण घटनेशी जोडलेला आहे. फ्रान्समधील ल्योन शहरात त्या काळात लैंगिक कामगारांवर पोलिसांकडून सातत्याने होणारे छापे, अटकसत्रे आणि अन्यायकारक वागणूक याविरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. अनेक लैंगिक कामगारांनी सेंट-निझिएर चर्चमध्ये आश्रय घेत आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी सुरक्षिततेची हमी, पोलिसी अत्याचारांपासून संरक्षण आणि मानवी सन्मानाची मागणी केली. या आंदोलनाने जगभरातील लैंगिक कामगारांच्या हक्क चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या संघर्षाची आठवण म्हणून २ जून हा दिवस पुढे 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज या दिवसाचे स्वरूप जागतिक झाले असून अनेक देशांमध्ये या निमित्ताने परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम, मानवी हक्क मोर्चे आणि धोरणात्मक चर्चांचे आयोजन केले जाते.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवनाविषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

समाजातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे लैंगिक कामगारांविषयी असलेला सामाजिक कलंक. अनेकांना वाटते की या व्यक्तींना समाजात सन्मानाचे स्थान मिळण्याचा अधिकार नाही. त्यांच्याशी संवाद साधताना लोक टाळाटाळ करतात. त्यांना भाड्याने घर मिळणे कठीण होते. अनेक वेळा त्यांची मुले शाळांमध्ये भेदभावाला सामोरी जातात. काही कुटुंबे आपल्या मुलांना अशा मुलांशी मैत्री करण्यासही परवानगी देत नाहीत. अशा प्रकारच्या सामाजिक बहिष्कारामुळे लैंगिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे मानसिक आरोग्य प्रभावित होते. सततच्या अपमानामुळे आत्मविश्वास कमी होतो आणि समाजापासून दूरावण्याची भावना निर्माण होते.

लैंगिक कामगारांच्या जीवनातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हिंसा. ग्राहक, दलाल, गुन्हेगारी टोळ्या, स्थानिक गुंड, काही वेळा पोलिस यांच्याकडूनही त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक स्वरूपाच्या हिंसेच्या घटना अनेकदा घडत असतात. परंतु सामाजिक कलंक आणि न्याय मिळण्याबाबतची अनिश्चितता यांमुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी, हिंसाचाराचे चक्र सुरूच राहते. कोणत्याही नागरिकाप्रमाणे लैंगिक कामगारांनाही सुरक्षिततेचा आणि न्याय मिळविण्याचा अधिकार आहे, ही बाब समाजाने मान्य करणे आवश्यक आहे.

आरोग्य हा लैंगिक कामगारांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेला महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग, एचआयव्ही/एड्स, प्रजनन आरोग्याच्या समस्या, मानसिक ताण, नैराश्य आणि व्यसनाधीनता यांसारख्या अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः एचआयव्ही प्रतिबंधाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. कंडोम वापराबाबत जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि उपचार सुविधा यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, अजूनही अनेक ठिकाणी आरोग्यसेवा मिळविताना लैंगिक कामगारांना भेदभावाचा सामना करावा लागतो. डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचारी त्यांच्याशी पूर्वग्रहदूषित वागणूक करतात. त्यामुळे आरोग्य सेवा सर्वांसाठी समान आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

लैंगिक कामगारांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्नदेखील दुर्लक्षित राहतो. सततचा सामाजिक तिरस्कार, असुरक्षितता, हिंसा, आर्थिक ताण आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यांमुळे अनेक व्यक्तींना नैराश्य, चिंता आणि भावनिक तणावाचा सामना करावा लागतो. मानसिक आरोग्याच्या सेवा या समुदायापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. त्यामुळे समुपदेशन, मानसोपचार आणि मानसिक आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि तो लैंगिक कामगारांनाही तितकाच लागू होतो.

लैंगिक कामगारांच्या मुलांचे जीवन अनेकदा संघर्षमय असते. समाजातील पूर्वग्रहांमुळे त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात अडथळे निर्माण होतात. काही मुलांना त्यांच्या पालकांच्या व्यवसायामुळे चिडवले जाते किंवा अपमानित केले जाते. परिणामी, अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडतात. शिक्षणाचा अभाव म्हणजे पुढील आयुष्यातील संधींची कमतरता. त्यामुळे गरिबी आणि सामाजिक वंचिततेचे चक्र कायम राहते. या परिस्थितीत शासन, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्रितपणे काम करून अशा मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिष्यवृत्ती, निवास सुविधा आणि भावनिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय.

दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती तुलनेने गुंतागुंतीची आहे. येथे लैंगिक काम स्वतःमध्ये थेट गुन्हा नाही, परंतु त्याच्याशी संबंधित अनेक कृतींवर कायदेशीर निर्बंध आहेत. त्यामुळे लैंगिक कामगार अनेकदा कायदेशीर अनिश्चिततेत जगतात. अलीकडच्या वर्षांत न्यायालयांनी लैंगिक कामगारांच्या मानवी प्रतिष्ठेचा आणि घटनात्मक अधिकारांचा पुनरुच्चार केला आहे. न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हा दृष्टिकोन मानवाधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

लैंगिक कामगारांच्या सक्षमीकरणासाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संघटना कार्यरत आहेत. या संस्था आरोग्य सेवा, कायदेशीर मदत, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, समुपदेशन आणि जनजागृती यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देतात. अनेक ठिकाणी लैंगिक कामगारांनी स्वतःच्या संघटना स्थापन करून आपले प्रश्न मांडण्यास सुरुवात केली आहे. ही बाब त्यांच्या आत्मसन्मानासाठी आणि नेतृत्व विकासासाठी महत्त्वाची आहे. जेव्हा एखादा समुदाय स्वतःच्या प्रश्नांसाठी संघटित होतो, तेव्हा सामाजिक बदलाची प्रक्रिया अधिक प्रभावी ठरते.

स्त्रीवादी चळवळींमध्येही लैंगिक कामाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते हा व्यवसाय स्त्रियांच्या शोषणाशी संबंधित आहे, तर काहींच्या मते तो महिलांच्या स्वायत्ततेचा आणि निवडीच्या अधिकाराचा भाग आहे. या वादांमध्ये विविध मतभेद असले तरी लैंगिक कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मानवी हक्कांचे संरक्षण हा समान धागा दिसून येतो. त्यामुळे मतभेदांपलीकडे जाऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात लैंगिक कामगारांच्या असुरक्षिततेचे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले. लॉकडाऊनमुळे त्यांचे उत्पन्न अचानक बंद झाले. अनेकांकडे बचत नव्हती, सामाजिक सुरक्षा नव्हती आणि पर्यायी रोजगाराच्या संधीही नव्हत्या. परिणामी, हजारो कुटुंबांना अन्न, औषधे आणि निवाऱ्याच्या समस्या निर्माण झाल्या. या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी मदतीचा हात पुढे केला. या अनुभवाने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले.

आर्थिक सक्षमीकरण हा लैंगिक कामगारांच्या जीवनातील बदलाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अनेक व्यक्तींना पर्यायी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा लाभ मिळाल्यास त्यांचे जीवन अधिक स्थिर होऊ शकते. काही व्यक्तींना हा व्यवसाय सोडून इतर क्षेत्रांत काम करायचे असते, परंतु शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुनर्वसन व कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेब मालिका आणि वृत्तांकनामध्ये लैंगिक कामगारांचे चित्रण अनेकदा रूढ कल्पनांवर आधारित असते. काही वेळा त्यांना गुन्हेगारी, नैतिक अधःपतन किंवा सनसनाटीपणाशी जोडले जाते. अशा चित्रणामुळे समाजातील पूर्वग्रह अधिक बळकट होतात. माध्यमांनी त्यांच्या जीवनातील वास्तव, संघर्ष, मानवी भावना आणि सामाजिक प्रश्न यांचे संतुलित व संवेदनशील चित्रण करणे आवश्यक आहे. जबाबदार पत्रकारिता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

सामाजिक कार्याच्या क्षेत्रात लैंगिक कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा मानला जातो. सामाजिक कार्यकर्ते या समुदायासोबत काम करताना अधिकाराधारित दृष्टिकोन स्वीकारतात. त्यांच्या गरजा समजून घेणे, त्यांना उपलब्ध संसाधनांशी जोडणे, त्यांच्या नेतृत्व क्षमतेला प्रोत्साहन देणे आणि समाजातील भेदभाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हे सामाजिक कार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. सामाजिक न्यायाची संकल्पना तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा सर्वात वंचित घटकांनाही समान संधी उपलब्ध होतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध मानवी हक्क संघटना आणि जागतिक संस्था लैंगिक कामगारांच्या हक्कांसाठी कार्य करीत आहेत. त्यांचा भर आरोग्यसेवा, कायदेशीर संरक्षण, हिंसाचारापासून सुरक्षा आणि सामाजिक समावेशन यांवर असतो. या प्रयत्नांमुळे अनेक देशांमध्ये धोरणात्मक चर्चा सुरू झाल्या आहेत. तथापि, अजूनही अनेक समाजांमध्ये या विषयाविषयी खुलेपणाने चर्चा करण्यास संकोच वाटतो. त्यामुळे जनजागृती आणि संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान हा तिच्या व्यवसायावर अवलंबून नसतो. मानवी हक्कांची संकल्पना ही सर्वांसाठी समान आहे. लैंगिक कामगारांविषयी सहानुभूती, संवेदनशीलता आणि वास्तववादी दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. त्यांना केवळ दयेचे पात्र समजण्याऐवजी अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे ही लोकशाही समाजाची जबाबदारी आहे. त्यांच्या जीवनातील समस्या सोडविण्यासाठी केवळ कायदे किंवा योजना पुरेशा नाहीत; तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन आपल्याला विचार करण्यास भाग पाडतो की सामाजिक न्याय म्हणजे नेमके काय? समानता म्हणजे केवळ संधींची समानता की सन्मानाचीही समानता? एखादी व्यक्ती समाजाच्या कोणत्या स्तरात राहते यावर तिच्या मानवी हक्कांचे मूल्य ठरू शकते का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपण अधिक समतामूलक आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतो. शिक्षण, जनजागृती, सामाजिक संवाद, संवेदनशील धोरणे आणि मानवी हक्कांविषयीची बांधिलकी यांद्वारे लैंगिक कामगारांचे जीवन अधिक सुरक्षित, सन्माननीय आणि न्याय्य बनविता येऊ शकते.


आजच्या काळात विकासाची संकल्पना केवळ आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित राहिलेली नाही. विकास म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे. समाजातील कोणताही घटक उपेक्षित राहू नये, हीच खरी लोकशाही आहे.

लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ एका समुदायाचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समावेशन आणि न्याय यांची परीक्षा आहे. या समुदायाकडे पूर्वग्रहांच्या चष्म्यातून नव्हे, तर मानवतेच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिनाचे खरे महत्त्व याच ठिकाणी आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी हक्क सार्वत्रिक असतात आणि ते कोणत्याही व्यवसाय, जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्थितीवर अवलंबून नसतात. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. या मूल्यांचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत समाज ठरतो. त्यामुळे २ जूनचा हा दिवस केवळ स्मरणदिन म्हणून नव्हे, तर सामाजिक संवेदनशीलता, मानवी प्रतिष्ठा आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीच्या संकल्पनेला बळ देणारा दिवस म्हणून साजरा केला जाणे आवश्यक आहे. अशा समताधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायप्रिय समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे, हीच या दिवसाला खरी मानवंदना ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



# पोस्ट ऑफिस, अमेरिकेतले....

कन्येकडे अमेरिकेत आलो असताना तिच्या कामानिमित्त अमेरिकेमधील पोस्ट ऑफिस मध्ये जाण्याचा योग आला. पोस्ट ऑफिस हा शब्द भारतामध्ये उच्चारताच जुनी इमारत, कंटाळलेले कर्मचारी, प्रचंड गर्दी इत्यादी गोष्टी एकाच वेळेला डोक्यात येतात. अमेरिकेतील पोस्ट ऑफिस हे एखाद्या कॉर्पोरेट ऑफिस सारखे होते.

या ऑफिसमध्ये बाहेरच्या बाजूला विविध आकाराचे लिफाफे विक्रीसाठी ठेवण्यात आलेले होते. मोठ्यात मोठे पार्सल ठेवता येऊ शकेल अशी विविध प्रकारची वेष्टने, प्लास्टिकच्या मोठ्या पिशव्या, कोरूगेटेड बॉक्सेस , अनेक आकाराच्या चिकटपट्ट्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. पोस्टामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सेवांची माहिती तेथील टीव्ही स्क्रीनवर ठराविक काळानंतर येत होती. दुर्मिळ किंवा कमी प्रमाणात छापलेली पोस्टाची तिकिटे विक्रीसाठी उपलब्ध होती. कोणती तिकिटे विक्रीला उपलब्ध आहेत याचा डिस्प्ले ठेवण्यात आला होता. माझ्या मुलीने दिलेले पार्सल किती दिवसात साध्या पोस्टाने जाईल, गतिमान सेवेसाठी किती दिवस लागतील आणि दोन्ही साठी किती चार्जेस याची माहिती सविस्तरपणे दिली गेली. पार्सल ट्रॅकिंगची व्यवस्था असल्याबद्दलही माहिती देण्यात आली. विचारलेल्या शंकांची शांतपणे उत्तरे दिली जात होती. कामासाठी आलेले लोक रांगेमध्ये शांतपणे उभे राहून आपली कामे करून घेत होते. दोन कर्मचाऱ्यांची व्यवस्था असूनही सर्व कामे सुरळीतपणे सुरू होती. काम करणारे कर्मचारी हसतमुखाने काम करत होते हे विशेष! यानिमित्ताने अमेरिकेतील पोस्ट खात्याची अन्य माहिती पुढील प्रमाणे थोडक्यात सांगता येईल.

**युनायटेड स्टेट्स पोस्टल सर्विस** – युनायटेड स्टेट्स पोस्टल सर्विस ही अमेरिकन सरकारची पोस्टासाठीची स्वतंत्र एजन्सी आहे. युनायटेड स्टेट्स फेडरल गव्हर्मेंट कडे देशातील पोस्टल सेवेची संपूर्ण जबाबदारी आहे. १६ जुलै १७७५ यावर्षी सुरू झालेली ही सेवा विविधप्रकारच्या सुधारणा होत एक जुलै १९७१ पासून युनायटेड स्टेट्स पोस्टल सर्विस या नावाने कार्यरत आहे. या सेवेचे मुख्य कार्यालय वॉशिंग्टन डीसी येथे आहे. अमेरिकन सरकारच्या या खात्यात २०२४ या वर्षात, ५, २५, ३७७ कायम कर्मचारी आणि १, १४,६२३ इतके अन्य कर्मचारी होते. २०२४ या वर्षात पोस्टल खात्याची ३३,६४१ कार्यालये कार्यरत होती. या खात्याचा यावर्षी ८०.५ अब्ज डॉलर्स इतका महसूल होता.आणि ९.५ अब्ज डॉलर्स इतके निव्वळ उत्पन्न होते. टपाल वितरणासाठी या खात्याकडे स्वतःच्या मालकीची २,३५,००० पेक्षा अधिक उत्तम बनावटीचे वाहने असून सन २०२८ पर्यंत नव्याने ६६,००० इलेक्ट्रिक वाहने घेण्याचे नियोजन आहे. दूर अंतरावरील टपालासाठी विमान सेवेचा उपयोग करण्यात येतो. सर्व टपालांचा बटवडा वाहनाद्वारे करण्यात येतो. पत्ता लिहिण्यासाठी पत्त्याच्या अन्य तपशिलासह झिप कोडचा वापर करण्याबद्दल सर्व वापरकर्त्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. टपालावरील पत्त्याचे झिप कोडचे सॉर्टिंग मशीनद्वारे करण्यात येते. साध्या टप्प्याने उशिरात उशिरा पाचव्या दिवशी टपाल पोहोचते. पार्सल आणि विशेष टपालांसाठी ट्रॅकिंग सुविधा उपलब्ध आहे. टपाल आणि पार्सल सेवेसाठी अमेरिकेमधील विश्वासार्ह व्यवस्था म्हणून या विभागाकडे पाहण्यात येते.

**– डॉ. अभय मंडलिक**

# भारताचा मूळ स्वभाव 'वसुधैव कुटुंबकम्' - लीनाताई गहाणे


## राष्ट्र सेविका समितिच्या प्रवेश व प्रबोध वर्गाचा समारोप संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथील डॉक्टर हेडगेवार रुग्णालयाच्या रामचंद्र मेडिकल इन्स्टिटयूट च्या भव्य प्रांगणात राष्ट्र सेविका समितिच्या प्रवेश व प्रबोध शिक्षा वर्गाच्या दिनांक ३० मे रोजी संपन्न झालेल्या समारोप प्रसंगी समितिच्या अखिल भारतीय सह बौद्धिक प्रमुख लीनाताई गहाणे यांनी 'जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान' या विषयावर गुंफण करताना भारताचा मूळ स्वभाव, भारताने जगाला दिलेल्या योग अध्यात्म आणि तत्वज्ञान या महत्त्वपूर्ण देणग्या आणि संपूर्ण विश्व हे कुटुंब असून तिथे शांतता समृद्धी नांदली पाहिजे या उदात्त विचाराने आंतरराष्ट्रीय पातळीवर पावले टाकणारा भारत हा विश्वगुरूत्वाकडे वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी प्रत्येक बिंदूला काही न काही काम करणे आवश्यक आहे. भारतीय समाजाने महिला स्वातंत्र्य, महिला शिक्षण ह्याला मागे टाकलेले नाही. वेदकाळातील ऋषिकांपासून ते मंगलयानातील महिला शास्त्रज्ञ यांच्या पर्यन्त आपल्याला हे दिसून येते. स्त्री ही कुटुंबाचा परत्वे समाजाचा आधार स्तंभ आहे असे अत्यंत प्रभावी , राष्ट्रनिष्ठ , ओघवत्या शैलीत विचार मांडून लीनाताई गहाणे यांनी उपस्थितांना खिळवून ठेवले.

राष्ट्र सेविका समितिच्या दिनांक १५ मे पासून सुरू झालेल्या या पंधरा दिवस प्रवेश व प्रबोध वर्गाचा समारोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी प्रतिमा पूजन व भगव्या ध्वजाचे अनावरण झाले. त्यांनंतर शिक्षार्थी सेविकांनी मानवंदना , घोष , गणसमता, नियुद्ध, दंड , यष्टी , योगचाप , व्यायाम योग यांची अत्यंत देखणी प्रात्यक्षिके सादर केली. महिला ही मन आणि मनगट यांनी सक्षम बनून ती राष्ट्रभक्त नागरिक घडली पाहिजे यासाठी समिति प्रयत्न करते असे प्रतिपादन समितिच्या देवगिरी प्रांताच्या सहकार्यवाहिका सौ. अंजली बडवे यांनी केले. याप्रसंगी आर के दमाणी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. सौ. शिरडकर यांनी बोलताना समिति कार्याची सांप्रत काळातील आवश्यकता प्रतिपादन करताना या मुली देशाच्या उज्वल भवितव्यात आपले भरभरून योगदान देतील असे मनोगत व्यक्त केले. प्रवेश वर्गाचा अहवाल सर्वाधिकारी म्हणून संघमित्रा कापडी यांनी तर प्रबोध वर्गाचा अहवाल सौ. राधिका भिडे यांनी सादर केला. या शिक्षा वर्गात प्रवेश साठी ७१ तर प्रबोधसाठी ६३ तरूणी उपस्थित होत्या. समारोप कार्यक्रमास संभाजीनगर शहरातील नागरिक , रा. स्वं.संघ पदाधिकारी तसेच स्वयंसेवक , सेविका बहुसंख्येने उपस्थित होते. संपूर्ण वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. १५ दिवसांच्या ह्या वर्गात मुलींना मन मनगट मजबूत करण्या सोबतच देशभक्तीचे संस्कार देऊन सज्जन शक्ती निर्माण करण्याचा उद्देश होता. विशेष ह्या वर्गात मातृहस्तेन भोजन हा वेगळा उपक्रम झाला तसेच उल्कानगरी ह्या भागात सघोष पथसंचलन निघाले होते.

# श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिर मिटमिटा येथे अधिक मास प्रीत्यर्थ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिर मिटमिटा येथे पुरुषोत्तम मास म्हणजेच अधिक मास प्रीत्यर्थ पवमान अभिषेक, शिवाला लघुरुद्र व सत्यनारायण पूजा आदी कार्यक्रमांचे आयोजन होत आहे.

तसेच सौ सुरेखा काणे यांचे श्रीमद्भागवत सप्ताह दिनांक ३१.०५.२६ पासून सुरू झाला असून ०६.०६.२६ पर्यंत भागवत सप्ताह दुपारी ४ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत भाविक या कार्यक्रमा चा लाभ घेत आहेत.

'कलियुगात नामाचा महिमा अगाध आहे. सर्वांनी नेहमी नाम जप करावा. कोणताही जप चालेल पण तो रोज होणे गरजेचे आहे. आजच्या काळात कुकर्म वाढू लागले आहेत त्यामुळे भागवत ग्रंथाचे श्रवण करणे अत्यंत आवश्यक आहे. भागवत ही श्रीकृष्णाची वाङ:मयीन मूर्ती आहे. भागवत ग्रंथाचे श्रवण केल्याने आपली भक्ती जागृत होईल. भक्ती व ज्ञान याचा ताळमेळ जमला की वैराग्य प्राप्त होते.

भक्ती ही ज्ञानयुक्त असली पाहिजे आणि ज्ञान हे भक्तियुक्त असले पाहिजे. ज्ञाना शिवाय भक्ती लंगडी आहे. इंद्रिया मुळे आपल्या मनाला भरकटू देऊ नका. नाम स्मरणानी मनाचे शुद्धीकरण होते. मनाचे शुद्धीकरण केल्याशिवाय चित्तशुद्धी होत नाही. नाम जपाने आपणास आनंद आणि प्रसन्नता मिळते. भागवत ग्रंथाचे चिंतन, मनन श्रवण आणि पठाण होणे आजच्या काळात गरजेचे आहे. सौ सुरेखा काणे भागवत सप्ताहाच्या पाहिल्या दिवशी लोकांसमोर मार्गदर्शन करताना बोलत होत्या. कार्यक्रमानंतर आरती होऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन



अहिल्यानगर, दि. १ (प्रतिनिधी) - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता.जामखेड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केले.

यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अभिवादन केले. याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सुरेश धस, आमदार काशिनाथ दाते आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक व त्याच परिसरातील महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



छत्रपती संभाजीनगर, १ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आज उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. समाजकल्याण, न्यायप्रिय राज्यकारभार आणि लोकहिताच्या कार्यामुळे इतिहासात अजरामर ठरलेल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या कोकणवाडी चौक येथील पुतळ्यास महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती शोभा बुरांडे, सदस्य अभिजीत जीवनवाल, राजू राजपूत, नगरसेविका किर्ती शिंदे, अर्चना नीलकंठ, छाया वाघचौरे, छाया खोजकर तसेच अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यासह अधिकारी नागरिक उपस्थित होते.

# ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचा मासिक मेळावा उत्साहात संपन्न



पुणे, दि. १ (प्रतिनिधी) - ज्येष्ठ नागरिक हे आमच्या मातापित्यासमान असून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमीच प्राधान्य दिले जाईल. उतारवयात एकमेकांशी हितगुज करण्यासाठी त्यांच्या सोयीप्रमाणे परिसरात मनपातर्फे विरंगुळा केंद्र उभारणीसाठी पाठपुरावा केला जाईल असे प्रतिपादन उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या मासिक मेळाव्यात ते बोलत होते. शनिवार दि. ३० रोजी सायंकाळी उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संस्थापक संदीप काटे उपस्थित होते. आपल्या भाषणात काटे यांनी समाजाच्या जडण घडणीमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे योगदान निश्चितच महत्वपूर्ण असून प्रभागाच्या विकास प्रक्रियेत ज्येष्ठांकडे दुर्लक्ष न करता त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध राहू असे प्रतिपादन केले.

यावेळी ज्येष्ठांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या मासिक मेळाव्यात मराठी - हिंदी गीतांच्या करावके कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये अनिल कुलकर्णी, सुभाष विधाते, रेखा आणि अशोक येळंमकर, सुरेखा पाटील, डी. बी. कडते, शशांक लोकरस, अविनाश इजारदार, आरती इजारदार , बालाजी काटे, श्यामकांत कोगे, साधना चौधरी आदिंनी आपली गायनाला सादर करण्याचा प्रयत्न केला. दोन - अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमात रमेश वाणी यांनी असोसिएशनच्या कार्याची माहिती देऊन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीने संदीप काटे आणि संजय भिसे यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शकुंतला शिंदे, निर्मला कासार, भामिनी महाले, शोभा राजगुरे, विमल मोंढेकर, अनिल कुलकर्णी, अशोक येळंमकर, सुभाष पाटील, सुभाष विधाते, दिलीप चौगुले, अनिलकुमार शाह, विवेकानंद लिगाडे आदींनी परिश्रम घेतले.

# वैजापूरात लोकमाता अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठाणच्या लोकोपयोगी उपक्रमातून अभिवादन



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - येथील लोकमाता अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठाण च्या वतीने रविवार(ता.३१)रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम आयोजित करून अहिल्यादेवी होळकर यांना शहरातील सर्व समुदायातील नागरिकांनी एकत्र येत अभिवादन केले. प्रथम सकाळी दहा वाजता अहिल्यादेवी होळकर स्मारक येथे तालुक्याचे आमदार प्रा. रमेश पा. बोरनारे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपाध्यक्ष रियाज शेख, अकिल शेख यांनीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच रक्तदान शिबिराचे उदघाटन ही केले. या मान्यवरांनी रक्तदात्याना प्रमाण पत्र वितरित केली. या प्रसंगी अकिल शेख, संजय निकम, पारस घाटे, श्रीराम गायकवाड, पंकज ठोंबरे, राजेश गायकवाड, आमिरअली, हमीद कुरेशी, लिमेश वाणी, देविदास वाणी, गोकुळ भुजबळ, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, प्रशांत त्रिभुवन, सचिन जोशी, शैलेश पोंदे, गिरीश चापानेरकर, अशोक पवार, सचिन राजपूत, दीपक साळुंके, श्री गायकवाड, श्री. जानराव, मंजुषा ढाकरे, सुनीता साखरे, श्रीमती कदम कल्याण काळे, प्रदीप साळुंके, ज्ञानेश्वर सिरसाट, सोपान पगार, चांगदेव उघडे यांची उपस्थिती होती. सूत्र संचलन व आभार धोंडीराम सिंह ठाकूर यांनी मानले. लोकमाता युवा प्रतिष्ठाण च्या वतीने आयोजित अहिल्यादेवी होळकरांच्या ३०१ व्या जयंतीनिमीत्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा मिरवणूक, मर्दानी खेळ व पारंपरिक सांस्कृतिक वाद्य,व रक्तदान शिबिर अशा विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून राजमाता अहिल्यादेवीं होळकर याना अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रम लोकमाता युवा प्रतिष्ठान ने आयोजित केले होते.

# वैजापूर रक्तदान शिबिरात २१ रक्तदात्यानी रक्तदान करून अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - महापुरुष किंवा समाज सुधारक यांच्या जयंती किंवा पुण्यतिथी कार्यक्रमात केवळ मिरवणूक काढून किंवा नाच गाणी न करता सामाजिक बांधीलकी जपत

रक्तदान सारखे सामाजिक उपक्रम घ्यावेत व सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन वैजापूर- गंगापूर तालुक्याचे विकासाची दूर दृष्टी असलेले आमदार प्रा.रमेश पा.बोरनारे यांनी रविवार(ता,३१)रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१व्या जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन करतांना केले .छत्रपती संभाजीनगर येथील सरला ब्लड डोनेशन सोसायटी द्वारा संचलित

'लोकमान्य ब्लड बँक' यांनी २१ रक्तदात्याचे रक्त संकलित केले या ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी रतीलाल चव्हाण, सहाय्यक उमेश जाधव, समीक्षा शिंदे, प्रियंका श्रीसुंदर यांनी हे रक्त संकलित .लोकमाता अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठाण यांच्या वतीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक पारस घाटे,जि.प.सदस्य श्रीराम गायकवाड, लिमेश वाणी, धोंडीरामसिंह राजपूत, कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन, देविदास वाणी, चांगदेव उघडे, सचिन राजपूत, दीपक साळुंके, मंजुषा ढाकरे, सुनीता साखरे,व लोकमाता युवा प्रतिष्ठाण चे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबीराला नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनीही भेट दिली. प्रास्ताविक, सूत्र संचलन व आभार ठाकूर धोंडीराम यांनी मानले.

# अमृत भारत दर्जा मिळालेल्या रोटेगाव रेल्वे स्टेशनवर प्रवाशी सुविधा पुरविण्याची जेष्ठांची मागणी



(स्टेशन अधीक्षक श्री मीना यांना निवेदन देतांना प्रकाश शेठ बोथरा, धोंडीराम राजपूत, सुरेश संत, व प्रवाशी)

वैजापूर दि. १ (प्रतिनिधी) - दक्षिण मध्य रेल्वे विभागीय व्यवस्थापक नांदेड यांनी येत्या १२ जून, रोजी मराठवाडा विभागातील सर्व खासदारांची रेल्वे प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी व प्रवाशी सुविधा बाबत चर्चास्तव, नांदेड येथे बैठक बोलाविलेली आहे.त्या अनुषंगाने येथील वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या जेष्ठ नागरिकांनी जिल्ह्यातील एकमेव अमृत भारत दर्जा मिळालेल्या रोटेगाव (दमरे)स्थानकावर रेल्वेने जाणारे जेष्ठ नागरिक व प्रवाशी यांच्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात या साठी सोमवार (ता.१)रोजी रोटेगाव द.म.रे चे स्टेशन अधीक्षक रमेशचंद्र मीना यांना एक निवेदन सादर केले आहे. ज्यात१) नांदेड-पुणे-हडपसर एक्सप्रेस २) नरसापूर-नगरसोल एक्सप्रेस. ३) हिंगोली-मुंबई (सीएसटी) जनशताब्दी एक्सप्रेस,४)

नांदेड-अमृतसर-सचखंड एक्सप्रेस या व इतर (अप -डाऊन) रेल्वे गाड्याना थांबा देण्याची मागणी केली आहे.निवेदनात पुढे मागणी आहे की, रोटेगाव पासून ३ की.मी.अंतरावर संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका वैजापूर शहर आहे.शहरात महसूल, कृषी वन विभाग, भूमी अभिलेख व पोलीस खात्याची विभागीय कार्यालये आहेत. दोन वैद्यकीय महाविद्यालये आहेत. तीन अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. जिल्हा सत्र न्यायालय आहे,आर.टी.ओ. कार्यालय आहे, जिल्ह्यातील मोठी व्यापार पेठ आहे, शिर्डी फक्त ४०की.मी.अंतरावर आहे. मोठी व्यापारी पेठ आहे. ३ नर्सिंग कॉलेज आहेत. तीन कृषी महाविद्यालये आहेत. येथून शेकडो व्यापारी, रुग्ण, प्रवासी मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, जालना, नांदेड येथे दररोज जातात, रोटेगाव स्टेशन लगत तीन हजार एकरावर मोठी नियोजीत एम.आय.डी. आहे. दोन साखर कारखाने आहेत. येथून पुण्याला तीन बसेस व मुंबईला दोन बसेस दररोज भरून जातात. रोटेगाव रेल्वे स्टेशन हे दमरे विभागाला मनमाड-छत्रपती संभाजीनगर या दरम्यान च्या सर्व स्टेशनात दररोज सर्वाधिक आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे एकमेव स्टेशन आह. या सर्व बाबीचा विचार करता रोटेगाव (दमरे)येथे वरील सर्व रेल्वे चा थांबा आवश्यक आहे असे निवेदनात नमूद करून या स्थानकावर आसन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ,कॅन्टीन व्यवस्था बाबत ही मागण्या आहेत.

सदरील निवेदन जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा,सचिव धोंडीरामसिंह राजपूत, कोषाध्यक्ष सुरेश संत,बबन क्षीरसागर,श्री महापुरे व प्रवाशी यांनी मीना याना देऊन येत्या बैठकीत वरील मागण्या ठेवण्याची विनंती केली.श्री.मीना यांनी सदरील निवेदन तात्काळ विभागीय रेल्वे अधिकाऱ्यांना पाठवत असल्याचे आश्वासन दिले.

# किमान १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

## १ जूनपासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) - सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील.

आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये. विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

# वाचनालय वाचक व जेष्ठ नागरिकाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) - येथील नगर पालिकेच्या वैजिनाथ वाचनालयातील वाचक वर्ग व जेष्ठ नागरिकांनी जेष्ठ नागरिक ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत रविवार(ता,३१)रोजी पालिका वाचनालय परिससरात असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला त्यांच्या ३०१ व्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले .या प्रसंगी सेवानिवृत्त केंद्र प्रमुख यु.बी. पारखे, श्री.मिटकरी,आरोग्य कर्मचारी बी,बी,थोरात,जेष्ठ नागरिक ईश्वरलाल शिंपी,ग्रंथालय सहायक एस. व्ही.राजपूत यांच्या सह वाचक वर्ग उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

दैनिक लोकविजय


# सुहास शिरसाट यांची भाजप पक्षश्रेष्ठींकडून दखल; विधान परिषदेची उमेदवार जाहीर



छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाने फुलंब्री नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट यांना उमेदवारी जाहीर केली आहे. या उमेदवारीमुळे तळागाळातील कार्यकर्त्यापासून विधान परिषद उमेदवारापर्यंतचा त्यांचा प्रवास पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. फुलंब्रीच्या राजकारणात सुहास शिरसाट हे गेल्या दोन दशकांहून अधिक काळ सक्रिय आहेत. नगरपंचायत अस्तित्वात येण्यापूर्वी त्यांनी तब्बल १५ वर्षे फुलंब्री ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून काम पाहिले. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर काम करत त्यांनी स्थानिक नेतृत्व म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. गावपातळीवरील नेतृत्वातून त्यांनी जनसंपर्क आणि संघटनात्मक कौशल्य विकसित केले.

# छत्रपती संभाजीनगर-जालना विधानपरिषद;भाजपला सुटलेल्या जागेवर अब्दुल सत्तारांच्या मुलाने भरला अर्ज

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- राज्यातील विधानपरिषद निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या तासात छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून एक खळबळजनक राजकीय घडामोड समोर आली आहे. महायुतीच्या जागावाटपात ही जागा भाजपला सुटलेली असून त्यांनी आपला अधिकृत उमेदवारही घोषित केलेला असताना, दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी या जागेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. ऐनवेळी घडलेल्या या अनपेक्षित प्रकारामुळे आता महायुतीमध्ये शिवसेनेकडून खरोखरच बंडखोरी होणार का, असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

या मतदारसंघासाठी महायुतीकडून भाजपने सुहास शिरसाट यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केलेली असतानाच, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपायला अवघा काही वेळ शिल्लक असताना समीर सत्तार यांनी अचानक निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. विशेष बाब म्हणजे, समीर सत्तार स्वतः उपस्थित नसताना त्यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी हा उमेदवारी अर्ज दाखल केल्यामुळे सध्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

वर्षानुवर्षे शिवसेनेचा पारंपरिक गड मानला जाणारा छत्रपती संभाजीनगर-जालना हा मतदारसंघ यंदाच्या जागावाटपात भाजपने आपल्या पदरात पाडून घेतल्याने स्थानिक शिवसेना नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी होती. शिवसेनेची ही हक्काची जागा भाजपला सोडली गेल्याच्या याच पार्श्वभूमीवर, आता थेट आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुत्राने उमेदवारी अर्ज दाखल केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना चांगलेच उधाण आले आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले, आधी आमची जिल्हा परिषद घेतली, महापालिका घेतली आणि आता विधानपरिषद घेतली नंतर पंचायत समित्या घेणार, ग्राम पंचायत समित्या पण घेऊन टाकणार. सर्व आम्हाला सत्तेतूनच हद्दपार करण्याचा हा प्रयत्न आहे. ही गंभीर परिस्थिती आहे. याबद्दल आमच्या नेत्याला जर माहिती मिळाली नाही, तर पश्चिम बंगालमध्ये जसे घडले तसे कदाचित महाराष्ट्रात घडू नये, याची भीती माझ्यासारख्या कार्यकर्त्याला आहे.

पुढे बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले, आधी तिकडे ममता बॅनर्जी आणि भाजपची युती होती.

पण युतीच्यानंतर काय परिस्थिती झाली आपण बघत आहोत. तसे आपल्याकडे होऊ नये, यासाठी आम्ही आमच्या नेत्याला तंतोतंत माहिती देऊ. माझ्या जिल्ह्यात आणि मराठवाड्यात जी परिस्थिती बघत आहे ते बघून मला आणि माझ्या कार्यकर्त्यांना दुःख होते. अब्दुल सत्तार यांनी केलेल्या आरोपांवर भाजप नेते व मंत्री अतुल सावे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

सावे म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या आदेशाला डावलून जर ते काही करत असतील तर हे अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. एखाद्या पक्षाच्या आमदाराला हे शोभत नाही. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या वेळी ज्यावेळेस महायुतीचा फॉर्म्युला ठरला त्यांनी सिल्लोडमध्ये सांगितले मी नाही करणार आणि आम्ही दाखवून दिले की त्यांच्या मतदारसंघात सुद्धा ५० टक्के ५ उमेदवार हे आमच्या पक्षाचे निवडून आले.

**एमआयएमकडूनही अर्ज दाखल**

या मतदारसंघात भाजप आणि शिवसेनेसोबतच आता एमआयएम पक्षानेही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून, भाजपच्या सुहास शिरसाट यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जूनपर्यंत असल्याने, आता समीर सत्तार आपला अर्ज मागे घेतात की बंडखोरी कायम ठेवत महायुतीसमोरील आव्हान वाढवतात, हे पाहणे अत्यंत औत्सुक्याचे ठरणार आहे.

## जून महिन्यातील विभागीय लोकशाही दिन रद्द

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यानुसार निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर विभागस्तरावरील जून-२०२६ मधील दुसऱ्या सोमवारी ०८ जून २०२६ रोजी होणारा विभागीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नसल्याचे विभागीय आयुक्त कार्याल याने कळविले आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहनही आयुक्त कार्यालयाने केले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो, परंतु आचारसंहितेमुळे या वेळी तो स्थगित करण्यात आला आहे.

# विधान परिषद निवडणूक: कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर झालेला असून निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. या आचारसंहितेचे अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जारी केले आहेत. या आदेशात त्यांनी पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांनी करावयाच्या कारवाईबाबत निर्देश दिले आहेत.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आदेशात दिलेले निर्देश याप्रमाणे- निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात, सहायक निवडणूक अधिकारी कार्यालयात, ईव्हीएम स्ट्रॉंग रुम, मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र येथे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून २४×७ पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देणे. अरुंद रस्ते, गर्दीच्या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवणे, मतदान साहित्याच्या वाहतुकीसाठी निवडणूक अधिकारी, सहायक निवडणूक यांच्या मागणीनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देणे, गत दोन सार्वत्रिक निवडणूकांमध्ये निवडणूक विषयक गुन्ह्यांमध्ये समावेश असलेल्या व्यक्तिंची यादी तयार करणे, निवडणूक विषयक गुन्ह्यांचा तपास गतिशील करणे, अवैध शस्त्र तस्करी, असामाजिक तत्वांना आळा घालण्यासाठी आंतरराज्य व राज्यांतर्गत वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करणे, भारती नागरिक सुरक्षा अधिनियम २०२३ चे कलम १२६, १२७, १२८ अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करणे, शस्त्र दारुगोळा यांच्या वाहतुकीबाबत दक्षतापूर्वक कडक तपासणी व खात्री करणे, मतदानाच्या तीन दिवस अगोदर व मतमोजणी होईपर्यंत कोणत्याही प्रकारचे अनुचित प्रकार अथवा शस्त्र, दारुगोळा यांचाई वाहतुक होणार नाही याची खात्री करणे, जिल्हादंडाधिकाऱ्यांचे ना हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय आंतरराज्य शस्त्र व दारुगोळा वाहतुक होणार नाही याची खात्री करणे, मतदानाच्या दिवशी मतदारांवर कोणत्याही प्रकारचा दबाव, अडथळा येणार नाही यासाठी उपाययोजना राबविणे, निवडणूक घोषीत झाल्यापासून ते संपेपर्यंत मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांना कायदा सुव्यवस्था विषयक अहवाल दररोज पाठविणे, निवडणूक नियमांची पायमल्ली करणाऱ्या व्यक्तिंविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, मतदार यादी विषयक खोटे घोषणापत्र सादर करणे, निवडणूक कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे इ. उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.



**विधान परिषदेसाठी छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य मतदारसंघातून देवयानी पाटील डोणगावकर यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून आज अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, खासदार डॉ. कल्याण काळे, आ.अंबादास दानवे यांची उपस्थिती होती.**

# विधान परिषद निवडणूक आचारसंहिता अंमलबजावणीसाठी प्रतिबंधात्मक आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर झालेला असून निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

निवडणूक आचारसंहिता कालावधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सकाळी ६ ते रात्री १० वा. नंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर वा कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार, इतर व्यक्ती यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करावा, त्यासाठी परवानगी घ्यावी व त्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्यावी,असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश दि.२५ जून पर्यंत अंमलात राहतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

निवडणूक आचारसंहिता कालावधीत सार्वजनिक इमारती, सार्वजनिक रस्ता इ. ठिकाणी कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी यांनी राजकीय बॅनर्स, पोस्टर्स, कटआऊट्स, पेन्टिंग्ज, होर्डिंग इ. अपघात होईल अशा पद्धतीने लावण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.याबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

निवडणूक आचारसंहिता कालावधीत सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय ऑटो रिक्षा, टेम्पो, सायकल रिक्षा, सायकल व इतर वाहनांवर राजकीय पक्षाचे बोधचिन्ह, झेंडे वा घोषवाक्य लिहिण्यास इ. निर्बंध घालण्यात आले आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश दि.२५ जून पर्यंत अंमलात राहतील असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मान्सूनपूर्व साथरोग प्रतिबंधासाठी महापालिकेची शहरव्यापी अबेट मोहीम सुरू



छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- मान्सूनपूर्व काळात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया तसेच इतर डासजन्य व जलजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य मलेरिया विभागामार्फत दि. १ जून २०२६ पासून संपूर्ण शहरात झोन अंतर्गत प्रभाग निहाय धडक अबेट मोहिमेस डेंगू प्रतिज्ञा घेऊन प्रारंभ करण्यात आला आहे.

महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विरोधी पक्षनेते समीर साजिद, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, आयुक्त अमोल येडगे तसेच वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभापती डॉ. सुनीता सोळुंके यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जीवशास्त्रवेत्ता व साथरोग अधिकारी डॉ. सय्यद सुमैय्या नाज यांच्या अधिपत्याखाली ही मोहीम शहरातील सर्व १० झोनमध्ये व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांनी मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने व जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच कीटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी उत्कृष्ट कार्य करण्याच्या सूचना दिल्या. जीवशास्त्रवेत्ता व साथरोग अधिकारी डॉ. सुमैय्या सय्यद यांनी मलेरिया झोन १ ते १० मध्ये सदर मोहीम डेंग्यू, मलेरिया व इतर कीटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी अतिजोखीम भागांमध्ये सर्वेक्षण, स्रोत निर्मूलन व अबेटिंगची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच मान्सूनपूर्व साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य अधिकारी तसेच एम.पी.डब्लू कर्मचाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली व सर्व आरोग्य निरीक्षक आणि क्षेत्रीय पर्यवेक्षक यांची स्वतंत्र आढावा बैठक आयोजित करून मान्सूनपूर्व तयारी, डासजन्य व जलजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच धडक अबेट मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विविध झोनमधील तयारीचा आढावा घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. या मोहिमेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागातील डॉ. आदित्य जोशी, श्रीमती मनीषा ठाकरे, दानिश सिद्धीकी, निखिल ठाकरे व सर्व मलेरिया पर्यवेक्षक यांचा सक्रियपणे सहभाग आहे.

मोहिमेदरम्यान आरोग्य विभागाची पथके घरभेटी, कंटेनर सर्वेक्षण, अबेट औषध टाकणे, ताप सर्वेक्षण, जनजागृती उपक्रम, माहितीपत्रकांचे वितरण, जनजागृतीपर स्टिकर्स लावणे तसेच 'कोरडा दिवस' पाळण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करणार आहेत. विशेषतः पाण्याच्या टाक्या, कुलर, ड्रम, फुलदाण्या व इतर पाणी साठवणाऱ्या ठिकाणी डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

महानगरपालिका आरोग्य मलेरिया विभाग यांनी नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले असून, घर व परिसर स्वच्छ ठेवून डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नष्ट करण्यासाठी सहकार्य करावे, घरातील कुलर्समधील पाणी तसेच फुलदाणी व मनी प्लँटमधील पाणी आठवड्यातून किमान एकदा बदलावे. घरातील पाणी साठविण्याची भांडी आठवड्यातून एकदा स्वच्छ घासून कोरडी करून त्यामध्ये ताजे पाणी भरावे, भांडी घासताना त्यांच्या तळाचा भाग व्यवस्थित घासला जाईल याची विशेष काळजी घ्यावी, हौदातील पाणी बदलणे शक्य नसल्यास त्यामध्ये गप्पी मासे सोडावेत. तसेच दिवसा व रात्री झोपताना पूर्ण बाह्यांचे व पूर्ण पाय झाकले जातील असे कपडे परिधान करावेत. असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून शहराला डेंग्यू, मलेरिया व इतर साथरोगांपासून सुरक्षित ठेवण्याचा महापालिकेचा संकल्प असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली सुरू; शेतकऱ्यांना घरबसल्या अर्जाची सुविधा

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- राज्यातील विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यासाठी कृषी विभागाने ऑनलाईन संगणकीय प्रणाली सुरू केली आहे. आता शेतकऱ्यांना पारंपरिक ऑफलाईन पद्धतीऐवजी कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील 'कृषी पुरस्कार' टॅबमध्ये जाऊन घरबसल्या ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार असून शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था आणि गटांनी सन २०२५ पासूनच्या विविध कृषी पुरस्कारांसाठी संगणक प्रणालीद्वारे तात्काळ ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

यापूर्वी कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन स्वरूपात सादर करावे लागत होते. त्यामुळे प्रस्ताव तयार करण्यासाठी खर्च येत असल्याने अनेक इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. तसेच प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी आणि संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रक्रिया अधिक सुलभ व प्रभावी करण्यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. या संगणकीय प्रणालीद्वारे पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करणे, तपासणी, मूल्यांकन आणि अहवाल निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविणे शक्य होणार आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ऑफलाईन चार प्रतींमध्ये प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा सादर करण्याची गरज भासणार नाही. अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे याची माहितीही शेतकऱ्यांना सहज मिळू शकणार आहे. छपाई, झेरॉक्स, प्रवास आणि पोस्टाचा खर्च कमी होऊन आर्थिक भारही कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य हे कृषी उत्पादन आणि कृषी उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते.

राज्यात दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था आणि गटांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात येतो.

# वादळी वाऱ्याने सोलर पंपाचे नुकसान : भरपाईची शेतकऱ्यांची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- रविवारी दुपारनंतर जिल्ह्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे वैजापूर तालुक्यातील भगूर गावात एका शेतकऱ्याच्या सोलर पंपाचे मोठे नुकसान झाले. वादळी वाऱ्याच्या तडाख्यात झाडाची मोठी फांदी सोलर पॅनलवर कोसळल्याने पॅनल तुटून नुकसान झाल्याची घटना घडली.

भगूर येथील गट क्रमांक ७७ मधील शेतजमिनीच्या मालक सरस्वतीबाई पंडितराव चव्हाण यांच्या शेतातील सोलर पंप प्रणालीचे नुकसान झाले आहे. या सोलर पंपाच्या माध्यमातून शेतीसाठी पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे झाडाची फांदी पॅनलवर पडल्याने संपूर्ण यंत्रणा बाधित झाली आहे.

अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि नैसर्गिक आपत्तींचा फटका शेतकऱ्यांना सातत्याने बसत असल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. एकीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसताना दुसरीकडे नैसर्गिक संकटांमुळे होणारे नुकसान शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे. दरम्यान आम्ही सामान्य शेतकरी आहोत.

.सोलर पंपाचे झालेले नुकसान आमच्यासाठी मोठे असून त्याची दुरुस्ती करण्यासाठी मोठा खर्च येणार आहे. प्रशासनाने पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी चव्हाण यांनी केली आहे. दरम्यान संबंधित विभागाने नुकसानग्रस्त शेताची पाहणी करून योग्य ती मदत द्यावी, अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**खुलताबादमध्ये पावसाचे आगमन, महावितरणची बत्ती गुल!**

दुपारच्या प्रचंड उकाड्यानंतर खुलताबाद शहरासह परिसरात १ जून रोजी पावसाने हजेरी लावली. मात्र, विजेच्या कडकडाटासह आलेल्या पहिल्याच पावसात शहरासह परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला आहे. महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून संपूर्ण परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे

(पान १ वरुन)

## व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या...

आहे. १९ किलोग्रामच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात तब्बल ४२ ते ५३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. परिणामी, वेगवेगळ्या शहरांमध्ये दरांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे आखतात सुरु असलेल्या युद्धाचा फटका आता व्यवसायांवर आणि अप्रत्यक्षपणे सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे.

## शेअर मार्केट क्रॅश, सेन्सेक्स...

कोटींचं नुकसान झालं आहे. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ३.७५ लाख कोटींनी कमी झालं.

शेअर बाजारात आज आयटी सेक्टरनं मार्केट सावरण्याचा प्रयत्न केला. निफ्टी आयटी अखेरपर्यंत मजबूत राहिला. निफ्टी एफएमसीजीमध्ये अडीच टक्क्यांची घसरण झाली. तर, निफ्टी पीएसयू बँक, निफ्टी ऑटोमध्ये २-२ टक्क्यांची घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. निफ्टी रिअल्टी २ टक्क्यांनी घसरण झाली. निफ्टी बँक १ टक्क्यांनी घसरला आहे.

## 'नीट' परीक्षा संगणकावर घेण्याची...

आधीच अनेक आव्हानांना तोंड देत आहेत.

न्यायमूर्ती नरसिंह म्हणाले, ''आम्ही कोणत्या अडचणींना तोंड देत आहोत हे तुम्हाला माहीत आहे. परीक्षा रद्द झाली होती आणि आता आम्ही ती पुन्हा घेत आहोत.'' त्यांनी अधिकाऱ्यांवरील दबावाचा उल्लेख केला आणि सांगितले की, अशा मागण्या यापूर्वीही फेटाळण्यात आल्या होत्या. जेव्हा वकिलाने पुनरुच्चार केला की ते फक्त सीबीटी परीक्षेबद्दल बोलत आहेत, तेव्हा न्यायालयाने सांगितले की त्यावर तत्काळ सुनावणी होऊ शकत नाही. न्यायमूर्ती नरसिंह म्हणाले, ''आम्ही सुट्ट्यांनंतर या प्रकरणाकडे पाहू.'' त्यानंतर न्यायालयाने ही मागणी इतर याचिकांसोबत सुनावणीसाठी सूचीबद्ध केली.

## स्वेच्छेने वेश्याव्यवसाय करणे...

वेश्याव्यवसाय करणाऱ्या कोणत्याही महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध पुनर्वसन केंद्रात पाठवले जाऊ शकत नाही. पुनर्वसनाची प्रक्रिया ही पूर्णपणे ऐच्छिक असली पाहिजे. राज्य सरकारने पुनर्वसनासाठी मदत आणि साधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, पण ती प्रक्रिया कोणावरही लादता येणार नाही. व्यावसायिक लैंगिक शोषणासाठी होणाऱ्या मानवी तस्करीच्या विरोधात दाखल याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने सांगितले की, पुनर्वसन किंवा संरक्षण गृहात ठेवण्याबाबतचा कोणताही निर्णय घेताना संबंधित महिलेच्या संमतीला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. महिलांना केवळ 'बचाव' आणि 'पुनर्वसन' करण्याच्या वस्तू समजू नका, त्यांच्या स्वायत्ततेचा आदर करा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

## बंगालमध्ये सुवेंदू अधिकारी...

प्रभार म्हणून डॉ. इंद्रनील खान, मालती रावा रॉय, राजेश महतो तर राज्य मंत्री म्हणून

ज्वेल मुर्मू, हरे कृष्ण बेरा, आनंदमय बर्मन, अशोक डिंडा, नदियार चंद बाउरी, विशाल लामा, शांतनु प्रामाणिक मौमिता बिस्वास मिश्रा, उमेश रॉय, पूर्णिमा चक्रवर्ती, कौशिक चौधरी, भास्कर भट्टाचार्य, दिवाकर घरामी, अमिया किस्कू, कलिता माझी, गर्गी दास घोष, बिराज बिस्वास, दीपांकर जना सुमना सरकार यांनी शपथ घेतली.

भाजपाच्या नेतृत्वाने म्हटलं आहे की विस्तारीत मंत्रिमंडळात विविध सामाजिक वर्गांना आणि स्थानिकांना संधी देण्याचा आम्ही आमच्या परिने प्रयत्न केला आहे. पहिल्या टप्प्यात शपथ घेणाऱ्या मंत्र्यांमध्ये महिला, मतुआ आणि राजवंशी तसंच आदिवासी समुदायाच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात आलं. औसग्रामच्या आमदार कलिता माजी यांनी गृहसेविका म्हणूनही काम केलं होतं. त्यांना राज्य मंत्री म्हणून शपथ देण्यात आली आहे. पश्चिम बंगालमध्ये कॅबिनेट विस्तार करुन भाजपा सरकारने विविध विभाग वाटपांमध्ये विविध प्रकारच्या लोकांना जबाबदारी दिली आहे. सरकारने निवडणुकीच्या आधी जी आश्वासनं दिली होती त्या योजना आता कार्यान्वित होतील अशी अपेक्षा आता सगळ्यांनाच आहे.

## पार्थ पवार राजकारणात सक्रिय...

पुढे चालू ठेवली. प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी बैठका झाल्याचा गौप्यस्फोट केला होता. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, यात गौप्यस्फोट काही नाही. ही वस्तुस्थिती आहे. अजितदादांचा निधानापूर्वी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या, ही बाब मी सुद्धा नंतर सांगितली आहे. काही बैठकांना मी नव्हतो, पण बैठकीतले तपशील मला दादा सांगायचे. त्यामुळे फार मोठा गौप्यस्फोट प्राजक्त तनपुरे यांनी केला असे काही नाही.

प्रत्येक निवडणुकीला उमेदवारी जाहीर अगदी काही तास शिल्लक असताना केली जाते, असे का होते? यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले, जेव्हा तीन पक्ष एकत्र निवडणुका लढवत असतात, तेव्हा जागावाटपावर चर्चा होत असते. काही जागांच्या बाबतीत प्रत्येक राजकीय पक्षाचे एक गणित असते ते मांडले जाते. तसेच सगळ्याच बाबतीत एकमत होत असते असे नाही. एनडीएमध्ये आमच्याकडे एक मोठे नेतृत्व आहे, त्या नेतृत्वाकडे अनेकवेळेला अनेक प्रश्न जात असतात. अमित शहा तिथे पूर्ण नियंत्रण करत असतात, ते सर्वांनाच अतिशय समान पद्धतीने न्याय देण्याचा प्रयत्न करत असतात. यात कधी वेळ लागत असतो असे तटकरे म्हणाले.